## (महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)

क्र.पोमसं/३/१०/६/पोनि डोंगरे (बदली)/२७६/१६

**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय**

शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१.

दिनांक:-२९/०९/२०१६.

### आदेश

संदर्भ:- सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दिनांक २५ जून, २०१४ व सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दिनांक ०६ एप्रिल, २०१५.

विषय:- सामान्य पदावधी पूर्ण होण्यापूर्वी किंवा मुदतपूर्व बदल्या.

(१)

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांनी त्यांचे क्र.पोअच./विचौ-१/क.अ.-पोनि डोंगरे/२०१६-३०९४, दिनांक ०२/०७/२०१६ च्या पत्रान्वये पोलीस निरीक्षक **प्रमोद सिताराम डोंगरे** यांचा कसुरी अहवाल पोलीस महासंचालक यांना सादर केला आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी त्यांचे क्र.नाप/डी-३/पोनि-डोंगरे/बदली/२०१६/३०४४, दिनांक ०४/०७/२०१६ च्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांनी सादर केलेल्या कसुरी अहवालाशी सहमत असल्याचे कळविले आहे.

(२)

उपरोक्त अहवालाची छाननी करण्यात आली. छाननी अंती सदरील प्रकरण पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांच्या समोर योग्य तो निर्णय घेण्यासाठी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

(३)

पोलीस निरीक्षक **प्रमोद सिताराम डोंगरे** यांचे बाबतचा पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचा दिनांक ०२/०७/२०१६ रोजीचा अहवाल, त्या अनुषंगाने आस्थापना शाखेने सादर केलेली टिप्पणीचे वाचन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी केले. त्या अहवालातील नमूद सर्व कागदपत्रांचे अवलोकन करुन पोलीस निरीक्षक **प्रमोद सिताराम डोंगरे** यांना चंद्रपूर जिल्ह्यात कार्यरत ठेवणे जनहितार्थ नाही व प्रशासकीयदृष्ट्या अयोग्य आहे, अशा निष्कर्षापर्यंत पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ पोहचले आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न मधील पोट कलम (२) सह सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.११, दिनांक ०६/०४/२०१५ मधील पोट कलम (२), मधील सुधारीत स्पष्टीकरणानुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना अपवादात्मक प्रकरणांमध्ये जनहितार्थ आणि प्रशासनिक निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन पोलीस निरीक्षक **प्रमोद सिताराम डोंगरे** यांची **चंद्रपूर जिल्ह्याबाहेर** बदलीस पोलीस आस्थापना मंडळाने मान्यता दिली असून त्यांची नवी पदस्थापना पोलीस निरीक्षक **नागपूर शहर** अशी देण्यात येत आहे.

**( राजकुमार व्हटकर )**

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),

महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस आयुक्त, नागपूर शहर.

२. यांनी पोलीस निरीक्षक प्रमोद सिताराम डोंगरे यांचा हजर झाल्याचा दिनांक ह्या कार्यालयास सत्वर कळवावा.

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर.

२. पोलीस अधीक्षक यांनी प्रमोद सिताराम डोंगरे यांना तात्काळ कार्यमुक्त करुन त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा व नवीन कर्तव्याच्या ठिकाणी त्वरीत हजर होण्याची लेखी सूचना त्यांना द्यावी.

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव,
गृहविभाग, महाराष्ट्र शासन,
२ रा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

**(लक्षवेधः-** श्री.र.ई.गिरी, कक्ष अधिकारी)

प्रत,

कार्यासन अधिकारी, का.क्र.२, ९, ११, १४-अ, ३६ व ४० (पोमसं कार्यालय).